# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.01.2026** **वार- शुक्रवार**

---

**साहित्य संमेलन**

मायमराठीच्या अस्तित्वाची लढाई आता आपल्या प्रत्येकाच्या उंबरठ्यावर येऊन पोचली आहे. उद्या तुमच्या देव्हाऱ्यावर विठोबा समवेत ज्ञानेश्वर आणि तुकारामाच्या प्रतिमा टिकाव्यात असं वाटत असेल, तर वेळीच जागे व्हा. तुमच्या खांद्यावर झेंडा कोणत्याही जातीचा, पक्षाचा वा धर्माचा असुदे. त्याचा दांडा हा मराठीच असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असुदे तिचा गोंडा मराठीच असायला हवा, मुलांना मराठी शाळेतच पाठवा अशी आग्रही भूमिका 99व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, विश्वास पाटील यांनी आज सातारा इथं संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी मांडली.13 कोटींच्या या समृद्ध ऐतिहासिक महाराष्ट्रामध्ये मराठी ललित पुस्तकांच्या विक्रीची किती दुकाने आहेत ? फक्त पस्तीस ! महाराष्ट्रात 36 जिल्हे आहेत. त्यापैकी 20 जिल्ह्यांच्या मुख्यालयामध्ये मराठी पुस्तक विक्रीचं दुकानच नाही. दोन कोटींच्या वर मुंबई महानगराची लोकसंख्या असून तिथं मराठी पुस्तक विक्रीची दुकानं फक्त पाच आहेत असं त्यांनी नमूद केलं.

तत्पूर्वी, ज्येष्ठ लेखिका, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते या संमेलनाचं उद्घाटन झालं. मराठी साहित्यातील दलित साहित्य हा भारतीय साहित्य विश्वाचा भक्कम आधारस्तंभ ठरला आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं. आपलं बहुभाषिक संस्कृतीचं वैभव पाहताना असं लक्षात येतं की, अनेक हिंदी लेखकांनी मराठी, बंगाली, उडिया आणि इतर भारतीय भाषांमधील साहित्यकृतींमधून प्रेरणा घेतली आहे. ही बहुभाषिक संपन्नता सर्वच प्रकारच्या लेखकांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे, असंही त्यांनी आवर्जून नमूद केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले की महाराष्ट्रामध्ये केवळ मराठीच सक्तीची भाषा आहे. त्रिभाषा सूत्रानुसार आणखी कोणती भाषा कोणत्या वर्गापासून भाषा शिकवायची याचा विचार करण्यासाठी डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल अंतिम टप्प्यामध्ये आहे असं त्यांनी नमूद केलं.

**विजय**

पुणे महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 35 सनसिटी-माणिकबाग इथून भाजपच्या उमेदवार मंजुषा नागपुरे आणि श्रीकांत जगताप बिनविरोध निवडून आले आहेत. हे दोघेही सलग तिसऱ्यांदा निवडणूक लढवत होते.

**जनजागृती**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाउंडेशन इथं पथनाट्य सादरीकरण, फ्लॅश मॉब आणि स्वाक्षरी मोहीम राबवत आज दिव्यांग बांधवांसाठी मतदान जनजागृती उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात दिव्यांग बांधवांसाठी सांकेतिक भाषेमध्ये मतदान शपथ घेण्यात आली.

**महापौर**

पुण्याचा महापौर पुन्हा भाजपाचाच होईल असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात व्यक्त केला. पुणे शहर भाजप माध्यम कक्षाचं उद्घाटन करताना ते बोलत होते.

**<u>पिफ</u>**

भारतीय चित्रपट सृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते बिस्वजित चॅटर्जी, ज्येष्ठ अभिनेत्री फरीदा जलाल आणि ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना 'पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड', तर ज्येष्ठ व्हायोलिन वादक आणि संगीतकार अमर हलदीपूर यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचं पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष आणि संचालक डॉक्टर जब्बार पटेल यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत जाहीर केलं. 24 वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यंदा 15 ते 22 जानेवारी या कालावधीत होणार असून, पुरस्कार, मराठी चित्रपट स्पर्धा, मराठी सिनेमा टुडे, कार्यशाळा यांची घोषणा डॉक्टर पटेल यांनी केली.

**<u>फुले</u>**

फुलेप्रेमी कवी विजय वडवेराव यांच्या संकल्पनेतून देशातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलचं उद्घाटन मान्यवर कवींच्या अध्यक्षतेखाली आज पुण्यामध्ये करण्यात आलं. येत्या 5 जानेवारी पर्यंत हा फुले फेस्टिव्हल नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात रंगणार असून, महाराष्ट्रासह देशविदेशातून 800 कवी, साहित्यिक, विचारवंत, कलाकार यामध्ये सहभागी झाले आहेत.

**<u>महावितरण</u>**

वीज कनेक्शनच्या नावात बदल करण्याविषयीच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्याची सुविधा महावितरणनं सुरू केल्यानंतर राज्यातील वीज ग्राहकांना त्याचा मोठा लाभ झाला आहे. दोन महिन्यांत 58 हजार 167 ग्राहकांनी घरबसल्या नावात बदल करून घेतला. त्याचबरोबर वीज ग्राहकांना मंजूर भार वाढवून घेण्यासाठी सुरू केलेल्या सुविधेचा 10 हजार 428 ग्राहकांना लाभ झाला आहे. या योजनेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असं आवाहन पुणे महावितरणनं केलं आहे.

**<u>पुरस्कार</u>**

आयुर्वेद, वनस्पती शास्त्र, रसशास्त्र, चिकित्सा अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या महाराष्ट्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या वैद्यांना वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेतर्फे वैद्यकीय पुरस्कारानं दरवर्षी गौरविण्यात येतं. यंदाचा महर्षि अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार मुंबईचे वैद्य नरेंद्र भट्ट यांना प्रदान करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील इतर 12 वैद्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती वैद्य विनायक परशुराम वैद्य खडीवाले यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. 15 जानेवारीला सायंकाळी टिळक स्मारक मंदिरात हे पुरस्कार दिले जाणार आहेत. पुरस्कार वितरण सोहळ्याचं यंदा एकेचाळिसावं वर्ष असून उल्लेखनीय कार्य करणा-या या वैद्यांची माहिती देणा-या स्मरणिकेचं प्रकाशन देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

**<u>राजभाषा</u>**

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागाच्या उत्कृष्ट राजभाषा कार्यान्वयन समितीकडून २०२४-२५ या वर्षासाठी उत्कृष्ट राजभाषा कार्यान्वयाबद्दल पुणे येथील पासपोर्ट अर्थात पारपत्र कार्यालयाला राजभाषा शिल्ड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पासपोर्ट कार्यालयाच्या राजभाषा कक्षाचे प्रभारी अमरेश सिंग यांनी, सी-डॅकचे वरिष्ठ संचालक डॉ. मनोज खरे यांच्याकडून हा पुरस्कार स्वीकारला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**